



**कोल्हापूर :** राजर्षि शाहू महाराजांना जलाभिषेक घालताना खासदार राजू शेट्टी

स्वाभिमानी विचार

Book-Post

प्रति,

RNI No. - MAH/MAR/2005/16213

Rgd. No.L2/17/RNP/ K.L.P/234/09-11

वर्ष ६ | अंक १२ | १५ मे २०११ | किंमत ५ रुपये | पाने २०

RNI NO-MAH/MAR/2005/16213
REGD NO - K.L.P/234/09-11

# स्वाभिमानी विचार

संपादक : खासदार राजू शेट्टी


कोल्हापूर : येथे झालेल्या पाणी संघर्ष यात्रेच्या समारोप सभेत बोलताना खासदार राजू शेट्टी.

## उद्योगांना पाणी दिल्यास पाईपलाईन फोडू

**राजू शेट्टींचा इशारा : संघर्ष यात्रेची सांगता**



कोल्हापूर, ता. ७ : शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी उद्योगांना देणाऱ्यांचे जाग्यावरच तुकडे करून पाईपलाईन फोडण्याचा इशारा आज खासदार राजू शेट्टी यांनी दिला. 'सत्याग्रह पाण्याचा पंचनामा भ्रष्टाचाराचा' या संघर्ष यात्रेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आयोजित मेळाव्यात ते बोलत होते. पाणीवाटपाचा अधिकार मंत्रिमंडळाकडे न ठेवता तो सभागृहाला द्यावा. त्यासाठी पावसाळी अधिवेशनात कायद्यात दुरुस्ती केली नाही, तर शेतकरी

पान ७ वर ▸



# सत्याग्रह पाण्याचा..पंचनामा भ्रष्टाचाराचा

**संपादकीय**

डॉ. महावीर अक्कोळे
mahaveerakkole@gmail.com

दरोड्यामध्ये लुटलेला ऐवज मध्यरात्री बसून वाटून घ्यावा तशा पध्दतीने विधानसभेत रात्री दीड वाटता महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण सुधारणा विधयक मंजूर करण्यात आले. नि मध्यरात्री घाईघाईत ते मंजूर करण्याचा हेतूही काहीसा तसाच असावा.या विधेयकानुसार महाराष्ट्रातील उपलब्ध पाण्याचे वाटप करताना आजवर चालत आलेला प्राधान्यक्रम बदलून पिण्याच्या पाण्यानंतर शेती व जनावरांसाठी पाण्याचा जो क्रम होता बदलून शेतीचे पाणी उद्योगांकडे वळविण्यात आले. त्यामध्ये जलप्राधिकरणाचे पाणी वाटपाचे अधिकार काढून घेऊन मंत्रीगटाला देण्यात आले नि या गोष्टीला कोर्टातही आव्हान देता येणार नाही अशीही तरतूद करण्यात आली. या विधेयकावर सदनात चर्चासुध्दा करण्यात आली नाही. या नव्या कायद्याने शेती क्षेत्राला व पर्यायाने शेतकऱ्यांना फार मोठा दणका बसणार हे लक्षात येताच राज्यात अस्वस्थता निर्माण झाली. पुढच्या दहा वर्षात या विधेयकामुळे शेतीची पूर्ण वाताहात होऊन शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळणार हे लक्षात येताच स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी संघर्षाचा पवित्रा घेतला. आजवर संघर्ष केल्याशिवाय शेतकऱ्याच्या पदरात दमडीही पडत नाही हा अनुभव त्यांच्या गाठीला होताच.इथे तर पदरात असलेलं काढून घ्यायचा घाट घातला होता. शेतकरी अस्वस्थ आहेत, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका तोंडावर आल्यात हे धान्यात येताच काँग्रेसी नेत्यांनी, आमदारांनी तक्रारसुरू केली व मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाणांनी विधेयकाचा फेरविचार करण्याचा निर्णयघेतला.विधानपरिषदेमध्ये हे विधेयक काही दुरूस्त्यांसह मंजूर करण्यात आले. त्यात पाणी वाटपाचा पिण्यासाठी, शेतीसाठी आणि मग उद्योगांसाठी असा प्राधान्यक्रम समंत झाला. तो बहुधा राज्यातल.ा अस्वस्थ शेतकऱ्यांच्या अदृष्य दबावामुळे. पण त्यात एक मेख मारली गेली. पाणी वाटपाचे सर्व अधिकार जलसंपदामंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीऐवजी मुख्यमंत्र्यांच्या अधिकाराखालील मंत्रीमंडळाला देण्यात आला.म्हणजे शेतकऱ्याचे पाणी ओरबडण्याचा अधिकार वाघा ऐवजी वाघोबाकडे देण्यात आला. फरक काय पडणार? न्याय पाणी वाटपाचे अधिकार वाघाऐवजी वाघोबाकडे आला. फरक काय पडणार? न्याय पाणी वाटपाचे अधिकार आजवर शेतीउद्यो-गावर सतत अन्याय करीत आलेल्या आलेल्या अन्यायी राजकीय व्यवस्थेकडे आले. अर्थात ही फसवी दुरूस्ती खासदार राजू शेट्टींना मान्य होणे शक्यच नव्हते. त्यांनी या विरोधात स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने उघड संघर्षाचे रणशिंग फुंकले नि घोषणा झाली अनोख्या पाण्याच्या सत्याग्रहाची एका नव्या संघर्ष यात्रेची. इथे तुलना करता येत नसली तरी गांधींच्या मीठाच्या सत्याग्रहाची नि दांडीयात्रेची आठवण मनात आपसूकच येऊन जाते. या संघर्षयात्रेत सामील होण्यासाठी खासदार शेट्टींनी अवघ्या महाराष्ट्रातल्या

पान ४ वर ▶

शेतकरी संघटना स्वाभिमानी

◆ वर्ष ६ ◆ अंक १२ ◆१५ मे २०११ ◆ **संपादक :** खासदार राजू शेट्टी Email : rajushetti@gmail.com
◆ **कार्यकारी संपादक : डॉ. महावीर अक्कोळे** ◆ **सह संपादक : डॉ. श्रीवर्धन पाटील, जगदीश इनामदार** ◆ **निवासी संपादक : सदाभाऊ खोत** ◆**मानद सल्लागार : मा. श्री. अण्णा हजारे** राळेगणसिद्धी, **न्या. पी. बी. सावंत** पुणे, **न्या.बी.जी.कोळसे पाटील** पुणे, . **प्रा. शरद पाटील** सांगली, **कुमार सप्तर्षी** पुणे, **माजी आमदार. वामनराव चटप** चंद्रपूर ◆ **व्यवस्थापक :** सुभाष शेट्टी ◆ **कार्यालय :** भरत पतसंस्थेच्या माडीवर, पोलीस स्टेशनसमोर, जयसिंगपूर, ता. शिरोळ. फोन : (०२३२२) २२४३२७

**SWABHIMANI VICHAR (Fortnightly)** स्वाभिमानी प्रतिष्ठान संचलित पाक्षिक स्वाभिमानी विचार हे पत्र संपादक ✲खासदार राजू उर्फ देवाप्पा आण्णा शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, पोलिस स्टेशननजीक, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. प्रकाशन स्थळ : स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य). दूरध्वनी : (०२३२२) २२४३२७. मुद्रण स्थळ : सुनील प्रिंटर्स, जयसिंगपूर. फोन (०२३२२) २२४३२७ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✲ यांची आहे. पाक्षिक स्वाभिमानी विचारमधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत. **Decleration No. Desk No. VII Home N.P.S.R./58/2005 RNI No. MAH/MAR/2005/16213 या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

वार्षिक वर्गणी
रु. १००/-

# शेतकऱ्यांचे पाणी हिसकवणाऱ्यांना सत्तेवर राहण्याचा अधिकार नाही : खा. शेट्टी

पन्हाळाः शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी उद्योगाकडे वळणाऱ्या सरकारला सत्तेवर राहण्याचा अधिकार नाही, असे प्रतिपादन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी केले. ते देवाळे ता. पन्हाळा येथे बोलत होते.

ते म्हणाले की, शेतकऱ्यांचे पाणी हिसकावून घेऊन ते पाणी उद्योगांना चढ्या दराने विकून स्वतःची तुंबडी भरवून घेऊन शेतकऱ्यांची लूट चालू केली आहे. शेतकऱ्यांनी हा अन्याय किती दिवस सहन करायचा. मरायचे आम्ही नि जगायचे त्यांनी हा कुठला न्याय? आता आमची सहनशिलता संपलेली आहे. येथून पुढे अन्याय सहन केला जाणार नाही. शेतकऱ्यांच्या वाट्याला जाल तर याद राखा असा सज्जड इशाराही त्यांनी दिला. भ्रष्टाचारावर बोलताना शेट्टी म्हणाले की, सरकारने आजपर्यंत जनतेच्या पैशाची खुलेआम लूट चालूच ठेवलेली आहे. देशात भ्रष्ट राजकारण्यांनी अब्जावधी रूपयांचा गफला केलेला आहे. ढेकर त्यांनी अजिबात दिलेली नाही. खाऊन खाऊन राजकारणी माजलेले आहेत. शेतकरी दरिद्री झालेला का झालेला आहे याचे उत्तर पाहिजे असल्यास राजकारण्यांकडे पाहिल्यास ते आपल्याला कळेल. शेतकऱ्यांनी आता मारयचे सोडा आता तुम्ही मारायला शिका. असे आवाहन खासदार राजू शेट्टी यांनी केले.

यावेळी वसतंराव पाटील, बी. जी. पाटील आदींनी मार्गदर्शन केले. स्वागत व प्रास्ताविक राजू कुलकर्णी यांनी केले. खासदार राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली सातवे, सावर्डे, बोरपाडळे, आरळे, नावली, देवाळे, आदी गावात पाणी संघर्ष यात्रेचे उत्स्फुर्त स्वागत करण्यात आले. यावेळी संदीप राजोबा, गुंडाभाऊ आवटी, प्रभाकर पाटील, संदीप पाटील आदी उपस्थित होते.









# सत्याग्रह पाण्याचा..पंचनामा भ्रष्टाचाराचा

▶ पान २ वरून

भूमिपुत्रांना साद घातलीय. उचस एक पाऊल निर्धाराचं..... चाल कर महाराष्ट्र देशा ............कोल्हापूरकडं अर्थात याहीवेळा या संघर्षयात्रेला भूमिपुत्रांकडूनच नव्हे तर गोरगरीब जनता, कामकरी कष्टकरी व मध्यवर्गीय पांढरपेशी शहरी जनतेकडूनसुध्दा प्रचंड प्रतिसाद मिळणार असा विश्वास चळवळीतूनच उभ्या राहिलेल्या या नेतृत्वाला आहे.हीसंघर्षयात्रा दोन ठिकाणाहून प्रतीकात्मक पाण्याचा कलश घेऊन कोल्हापूरकडे येईल. राजू शेट्टींची संघर्ष यात्रा सांगली जिल्ह्यातील चांदोली धरणापासून निघून चरण कोकरूड - समतेमठ शिराळे मार्गे ५मे ला पन्हाळगडावर येईल तर सदाभाऊ खोत यांची संघर्ष यात्रा त्याच दिवशी म्हणजे ३० एप्रिलला कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी धरणापासून निघून तारळे - परिते कोगे यवलूज - करंजफेण मार्गे ५ मेलाच पन्हाळ्यावर येईल. तिथे छत्रपती शिवरायांच्या या शेतकऱ्याच्या हक्काच्या पाण्याने अभिषेक घालून संघर्षाची नव्या लढ्याची प्रतिज्ञा करून ७ मेला ही संयुक्त संघर्षयात्रा आपली दुर्गम प्रदेशातील खडतर पदयात्रा ससंपवून कोल्हापुरात दाखल होईल नि शेतकऱ्यांच्या कैवारी असलेल्या छत्रपती शाहूच्या पुतळ्याला साक्षी ठेवून, विचार जनसमुदयासह आपली कैफियत मांडेल. या यात्रेसाठी निवडलेल्या स्थळांचे औचित्यही मोठे आहे. राधानगरी धरण हे छत्रपती शाहूराजांनी शेतकऱ्यांसाठी धरण बांधले नि त्याकाळी प्राधान्य शेती सिंचनालाच दिले ते राधानगरी धरण आज खासगीकरणाऱ्या नावाखाली वीजनिर्मितीसाठी म्हणून खासगी कंपनीला सरकारकडून दिले गेले आहे. तर चांदोली धरण हे पहिले मातीने बांधलेले धरण वसंतदादा पाटील यांनी खास शेतीला पाणी मिळावे म्हणून बांधले. पन्हाळ्यावर जाऊन छत्रपती शिवरायांना अभिवादन एवढ्यासाठी की शिवकालीन पाणीवाटप पध्दत ही आजही आदर्श समजली जाऊन काही प्रमाणात वापरली जाते. रयतेच्या शेतातल्या गवताच्या काडीलाही हात लावायचा नाही. असा राज्यादेश काढणाऱ्या शिवाजीमहाराजांच्या महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या हक्काच्या पाण्यावरच दरोडा घालण्याचा प्रयत्न खुद्द राज्यकर्त्यांकडून होतो आहे हे आपले दुर्दैव. आज छ. शाहू असते तर त्यांनी या राज्यकर्त्यांचे काय केले असते? मग हे सारे गाऱ्हाणे कोल्हापुरात छ. शाहूंच्या पुतळ्याजवळ महाराष्ट्रातल्या तमाम शेतकऱ्यांच्या वतीने नि साक्षीने जाहीररीत्या मांडायचे. नाहीतर कुठे मांडणार?

या ऐतिहासिक संघर्ष यात्रेबद्दल खुद्द खासदार राजू शेट्टी यांच्याशी बातचीत केली असता त्यांनी आपले म्हणणे अगदी स्पष्टपणे व ठामपणे मांडले. त्यांच्या मते आजवर महाराष्ट्रात नि या देशातसुध्दा जी छोटी मोठी धरणे बांधली गेली ती शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करून या धरणांच्या जागेवर असलेल्या विस्थापित शेतकऱ्यांचे पुनर्वसन केले गेले तेही शेतकऱ्यांच्या जमिनीवर. हे पुनर्वसनही अद्याप अनेक ठिकाणी केलेले नाही. धरणग्रस्तांच्या हालअपेष्टा चालूचा आहेत. अगदी परवाच सातारा जिल्ह्यातील धोम आणि कन्हेर धरणग्रस्तांना पुनर्वसन आराखड्यात मंजूर केल्याप्रमाणे रक्कम अद्यापही मिळाली नसल्याच्या निषेधार्थ तिथल्या शेतकऱ्यांनी जिल्हा पुनर्वसन कार्यालयावर मोर्चा काढला होता. मग पाणी अडवण्यापासून ते तिथल्या विस्थापितांपर्यत शेतकरी स्वतःचे नुकसान सोसून योगदान देतो. मोठ मोठ्या उद्योगांचे उद्योजकांचे याच्यामध्ये काय योगदान आहे? मग पाणी कुणाच्या हक्काचे आहे?तो हक्क काढून घेण्याच्या अधिकार अगदी मंत्रीमंडळासाठी असता कामा नये असे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे ठाम मत आहे. त्यासाठी नेमून शेतकऱ्यांचा हा हक्क अबाधित ठेवला पाहिजे. स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर या राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी व त्यांच्या मंत्रींडळाने राज्यातल्या एकूण पाण्यापैकी ५० टक्के पाणी केवळ शेतीसाठी वापरावे असा आग्रह धरला होता. पण दुर्देवाने महाराष्ट्रात आजही एकूण शेतजमिनी पैकी १७ टक्के जमीनच धरणाच्या सिंचनाखाली येते. बाकीच्यांना पाऊस पाण्यावरचं भरोसा ही सारी वस्तुस्थिती तळमळीने मांडून खासदारांनी प्रश्न विचारला की भविष्यात धरणांमधले हे पाणी उद्योगांना प्राधान्याने देऊन नि शेतकऱ्यांच्या शेतजमिनी तहानलेल्या

पान ५ वर ▶


श्री भरत अर्बन को-ऑफ बॅंक लि., जयसिंगपूर

ता. शिरोळ, जि. कोल्हापूर फोन : २२५४३०, २२५७२२ २२९९२३ फॅक्स नं. : ०२३२२ २२५७२३

■ २८ हजारांवर सभासद ■ संस्थापक, संचालक व्यवस्थापन ■ सर्व शाखा कार्यालये स्वत:चे इमारतीत ■ अद्यावत कॉम्प्युटर सेवा ■ सर्व शाखांकडे लॉकर्सची सोय ■लाखापर्यंतच्या ठेवीस विमा संरक्षण देशातील प्रमुख ४८८ शहरांवरील डी.डी.ची अल्प कमिशनमध्ये सोय ■ बॅंक सतत नफ्यात ■ ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर १/२ टक्के जादा व्याज ■१० ग्रॅम चोख सोन्यास रु. १४००० कर्ज १० टक्के व्याजदराने

| ठेवी | कर्जे | ऑडिट वर्ग | | स्वभांडवल | गुंतवणूक | एन.पी.ए. |
|---|---|---|---|---|---|---|
| ४१४७.९५ | २१७८.७१ | ---- | नफ्यात | ४५५.१५ | २१८९.४३ | ३.३७ टक्के |

श्री. व्ही. बी. हुग्गे.
बी. ए. बी. कॉम.
चिफ एक्झि ऑफिसर

श्री. अशोक शां रूणवाळ.
बी. कॉम
व्हा. चेअरमन
व सर्व संचालक

पै. विठ्ठल बाबूराव मोरे
एम. ए.
चेअरमन

# सत्याग्रह पाण्याचा..पंचनामा भ्रष्टाचाराचा

▶ पान ४ वरून

ठेवून हे सरकार या देशातील तमाम जनतेला खाऊ घालण्यासाठी अन्नधान्य कुठे उद्योगपतींच्या मोठमोठ्या कारखान्यात पिकवणार आहे का? या प्रश्नाला खरोखरच माझ्याकडे उत्तर नव्हते. कुणाकडेच नाही. या पाणीवाटप विधेयकाला उच्च न्यायालयात आव्हान देता येईल. असे जलसंपदा मंत्री म्हणत असले तरी विधेयकात असा कुठलाही स्पष्ट उल्लेख नाही असे कॉंग्रेसच्याच काही मंत्र्यांचे म्हणणे असल्याचे समजते. एका बाजूलाअन्नधान्याच्या साखरेच्या किंमतीवर नियंत्रण ठेवायचे. निर्यातबंदी लादायची वशेतकऱ्यांच्या उत्पादनाला दर मिळू द्यायचा नाही. तर दुसऱ्या बाजूला जास्त दर मिळतो . जास्त महसूल मिळतो म्हणून मोठ्या उद्योगांना पाणी, वीज भरमसाठ पुरवायची शिवाय कार्पोरेट आयकरात मोठी सूट द्यायची ह्या दुटप्पी धोरणांमुळे शेतकरी देशोधडीला लागेल नाही तर काय ? शेतकऱ्यांची ही ससेहोलपट केंद्रातल्या कृषीमंत्र्यांना,राज्याच्या उपमुख्यमंत्र्यांना नि त्याच्या तालावर नाचणाऱ्या जलसंपदा मंत्र्याना कळत नसेल असे म्हणायचे? आणि कळतंय पण वळत नसेल तर संघर्षाशिवाय पर्याय नाही . उदा. घ्यायचे झाले तर नाशिक जिल्ह्याल्या गोदावरीच्या खोऱ्यातील दारणा - गंगापूर धरणाऱ्या पाण्याचे देता येईल. या पाण्यावर नाशिक सह मराठवाड्यातील गंगापूर परिसरातील पिण्याचे पाणी व शेतीचीगरज भासते. सध्या शेतीसाठी या धरणाच्या कालव्यातून ११ टीएमसी पाणी देणे बंधनकारक असताना शेतीच्या वाट्याला येते अवघे ५ टीएमसी पाणी आता सिन्नरजवळ इंडिया बूल्स ची वीजनिर्मिती चालू होईल. तेव्हा याच धरणातून ३५०० दशलक्ष घनफूट पाणी वापरावे जाणार म्हणजे गोदावरी कालव्याचे पाणी आणखी घटणार. मग मंत्रीमंडळाने त्यांच्या अधिकारात या उद्योगाला पाणी दिले तर मग वीजनिर्मिती केली तर आणि त्याच वेळी शेतीला पाणी मिळेल व शेती उद्योगाला धोकादायक परावलंबित येईल,

खा. राजू शेट्टींनी संघर्षयात्रेचे रणशिंग तर या अन्यायाविरूध्द फुंकलेले आहेच पण या साऱ्या पाण्याच्या सत्याग्रहाला पार्श्वभूमी आहे ती रोज एक नव्याने उघड होणाऱ्या भ्रष्टाचारांची, महाघोटोळ्यांची या घोटाळ्यात देशातले, राज्यातले मोठमोठे पुढारी व त्यांच्या चेल्यांची नावे समोर येताहेत एका बाजूला हे चित्र असताना शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढतच आहेत. खासदार राजू शेट्टी व त्यांच्यास्वाभिनमानी शेतकरी संघटनेच्या याआत्मक्लेश यात्रेमुळे अट्ठल राजकारण्यांच्या सत्ता नि मत्ताधाऱ्यांच्या आणि घोटाळेबाजूच्या संवेदना कितपत जाग्या होतील. हा समाजसम ोरील यक्षप्रश्न असला तरी ज्या दिवशी सिंचनप्रकल्पाच्या पाणी वाटपाचे अधिकार पूर्णपणे राज्य सरकारला देणारे जलसंपत्ती विधेयक मध्यरात्रीनंतर मंजूर करण्यात आले. त्यानंतर दोनच दिवसांनी म्हणजे १८ एप्रिल ला जागतिक वारसा दिवस होता. नि यावर्षीच्या म्हणजे २०११ च्या या दिवसाचा मुख्य विषय होता. पाण्याच्या सांस्कृतिक वारसा. केंद्र सरकारच्या पानभर जाहिरातीही वृत्तपत्रात झळकल्या तेव्हा सरकारची या विषयातली (अ) संवेदनशीलता या विधेयकामुळेच पुरेशी बोलकी बनली आहे यात काही शंका नाही.





चांदोली (ता. शिराळा) : वारणा धरणाच्या पायथ्यापासून जलकुंभ कलश भरून घेवून शेतकरी संघटनेच्या संघर्ष पदयात्रेची सुरूवात करताना खासदार राजू शेट्टी. सोबत विकासराव देशमुख, बी. जी. पाटील, राम पाटील, प्रा. सुभाष शेट्टी व इतर.

# रक्ताचे पाट वाहिले तरी पाण्याचा हक्क सोडणार नाही

## खासदार राजू शेट्टी : धरणातील पाणी घेऊन संघर्ष यात्रा सुरू

शिराळा, ता. ३० : ''रक्ताचे पाट वाहिले तरी चालतील, परंतु आम्ही पाण्याचा हक्क सोडणार नाही,'' असा निर्धार खासदार राजू शेट्टी यांनी येथे व्यक्त केला. संघर्ष पदयात्रा संपेपर्यंत सायकललाही स्पर्श करणार नाही,'' असे प्रतिपादन मणदूर येथे सभेत केला. धरणातील पाण्याचे जलकुंभ कावडीतून खांद्यावर घेऊन संघर्ष यात्रेची सुरवात झाली. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने खासदार शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली पाण्यावरचा शेतकऱ्यांचा हक्क कायम राहण्यासाठी संघर्ष पदयात्रेला सुरवात झाली. आज सकाळी ११ वाजता चांदोलीजवळ वारणा धरणाच्या पायथ्याशी जलकुंभ कलश घेऊन यात्रेचा प्रारंभ झाला. धरणाच्या सांडव्यातून पाणी बाहेर पडते त्या ठिकाणी सकाळी ११ वाजेपर्यंत लोक एकत्रित झाले. खासदार शेट्टी व कार्यकर्त्यांनी धरणातून नदीत जाणाऱ्या पाण्याचे दोन जलकुंभ भरून घेतले. त्याचे पूजन महिलांनी केले. त्यावेळी घोषणांनी धरण परिसर दुमदुमून गेला.

खासदार शेट्टी म्हणाले, ''धरणासाठी शेतकऱ्यांनी जमिनी दिल्या. पुनर्वसन करण्यासाठीही शेतकऱ्यांनीच जमिनी दिल्या. मात्र शेतकरी व जनावरांचे पाण्यासाठी हाल होत आहे. शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी काढून घेण्याचे सरकारने ठरवले आहे. पाणी वाटपाबाबत काढलेला अध्यादेश त्याचा नमुना आहे. राज्यात आता पाणीमाफि या तयार झालेत. धरणातील पाणी एका रात्रीत उद्योगपतींना देऊन कधी टाकतील हे सांगता येत

पान ६ वर ▶




# लोकांमध्ये लढण्याचे बळ निर्माण करण्यात यशस्वी झालोः खासदार राजू शेट्टी

कोल्हापूरः मला लोकांमध्ये लढायचं बळ निर्माण करायचं होतं..... पाणी संघर्ष यात्रेच्या निमित्तानं ते करण्यात यश आल्याचं दिसतंय.... आता थांबायचं नाही..... या लोकबळावर, त्यांनी टाकलेल्या विश्वासावर पुढची वाटचाल करायची.....भूमीपुत्रांना त्यांच्या हक्काचं मिळवून द्यायचंच..... त्यासाठी त्यांना आधी लढायला प्रवृत्त करायंच. म्हणूनच जाणीवपूर्वकदुर्गम भाग निवडला. तिथे कोणत्याही वाहनाशिवाय पायी फिरलो........लोकांमधलाच एक होऊन गेलो.....त्यांच्यात मिसळताना, त्यांच्याशी बोलताना जनजीवनं कळत गेलं.......जन्मभर लक्षात राहतील असे अनुभव गाठीशी आले आता या अनुभवाच्या शिदोरीच्या जोरावर बदला घेण्यासाठी संघटीत आणि अविरत लढा चालूच ठेवायचा निर्धार केलाय......खासदार राजू शेट्टी बोलत होते.

गेले आठ दिवस शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी उद्योगांना वळणाऱ्या सरकारच्या निषेधार्थ आत्मक्लेष म्हणून खासदार राजू शेट्टी यांनी चांदोली ते कोल्हापूर अशी पायी पाणी संघर्ष यात्रा काढली. गेले आठ दिवस १८३ किलोमीटरची वाट कोणत्याही वाहनाशिवाय तुडवत कोल्हापुरात रयतेचा राजा शाहू महाराजांच्या पान १५ वर ▶




# प्रसंगी सरकारवरच चाल करू; सदाभाऊ खोत यांचा खणखणीत इशारा

## स्वाभिमानी च्या संघर्ष यात्रेस राधानगरीतून प्रारंभ

राधानगरी(प्रतिनिधी): नैसर्गिक पाण्याच्या समान हक्कासाठी पाणी वाटपात हौणाऱ्या अन्यायासाठी संघर्षयात्रेत उन्हातान्हातून चालत आलो. सरकारने या प्रश्नावर योग्य ती भूमिका न घेतल्यास प्रसंगी उद्या सरकारवरच चाल करू, असा आव्हानात्मक निर्धार स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत यांनी केला.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत यांच्या नेतृत्वाखाली राधानगरी धरण ते कोल्हापूर सत्याग्रह पाण्याचा ......पंचनामा भ्रष्टाचाराचा... संघर्ष यात्रेला राधानगरी धरणापासून प्रारंभ करण्यात आला. यावेळी झालेल्या सभेत सदाभाऊ खोत बोलत होते. अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष भगवानराव काटे होते. सुरूवातीला धरणस्थळावर जाऊन हजारो शेतकऱ्यांच्या उपस्थित जलपूजन करण्यात आले. पाण्याने भरलेली कावड घेऊन पाण्याचा सत्याग्रह करण्याचा निर्धार यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. त्यानंतर पाणी आमच्या पान १५ वर ▸

## संघर्ष यात्रेची क्षणचित्रे



















# संघटनेनं माझा स्वाभिमान जिवंत ठेऊन जगायला शिकवले: उल्हास पाटील

जयसिंगपूरः संघटनेन माझा स्वाभिमान जिवंत ठेऊन जीवन जगायला शिकवले. नाहीतर आपल्या जीवनाचा पतंग भरकटतच गेला असता, असे प्रतिपादन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे निष्ठावंत सेनापती कोल्हापूर जिल्हा उपाध्यक्ष उल्हास पाटील यांनी केले. ते नांदणी ता. शिरोळ येथे गाडी प्रदान कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी शिरोळ तालुक्यातील तमाम शेतकऱ्यांच्या वतीने उल्हास पाटील यांना महिंद्रा बोलेरो गाडी प्रदान करण्यात आली. तसेच जि.प. सदस्य प्रकाश परीट यांच्या फंडातून विविध विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी बोलताना पाटील म्हणाले की, जीवन सार्थकी लागत असताना राजू शेट्टीसारखा मित्र लाभला यातच सात जन्माची पुण्याई आली. आज ही मित्रता लाभली नसती तर उल्हास पाटील नेता म्हणून जनतेला पहायला मिळाला नसता. संघटनेसाठीच आपले जीवन असल्यामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेची स्वाभिमानी मान मरेपर्यंत ताटच राहिल.

कार्यक्रमाची सुरूवात खासदार राजू शेट्टी यांच्या हस्ते दीपप्रज्वलाने झाली. स्वागत जि. प. सदस्य प्रकाश परीट यांनी केले. तर प्रास्ताविक सागर संभूशेटे यांनी केले.खा. राजू शेट्टी यांच्या हस्ते गाडीचे पूजन करून उल्हास पाटील यांना गाडी प्रदान करण्यात आली. याचवेळी कार्यक्रमाचे औचित्य साधून खा. राजू शेट्टी यांना मानपत्र देण्यात आले. यावेळी आपल्या मनोगतात बोलताना खा. शेट्टी म्हणाले, एखाद्या राजपुत्राचे करावे एवढे लाड याभोळ्या भाबड्या जनतेनं केलं असल्याने हे माझे भाग्यच आहे असे मी समजतो. याचबरोबर राजकारणात मिळालेल्या संधीचे सोने कसे करायचे याचे उत्तम उदाहरण म्हणून प्रकाश परीट यांच्याकडे पाहता येईल.

यावेळी सदाभाऊ खोत म्हणाले, नांदणी हे गाव क्रांतीकारी गाव आहे. प्रकाश परीट यांच्यासारखा कार्यकर्त्याने नांदणीचे नंदनवन केले आहे. विकास कामांचा डोंगर रचणारा कार्यकर्ता मी पहिल्यांदाच पाहिलो आहे. या कार्यक्रमासाठी स्वाभिमानीचे जिल्हा अध्यक्ष भगवान काटे, पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रा. डॉ. जालधंर पाटील, नगरसेवक डॉ. महावीर अक्कोळे, शिरोळ तालुकाध्यक्ष अण्णासो चौगुले, उपाध्यक्ष आदिनाथ हेमगिरे, संभाजी मेंढे. सावकर मादनाईक, सांगली जिल्हाध्यक्ष बी. जी. पाटील, महावीर पाटील, संदीप राजोबा, जयकुमार कोले, पै. विठ्ठल मोरे, पंचायची समिती सदस्या प्रमिला पाटील, प्रकाश कांबळे, श्रीकांत माळी, सागर संभूशेटे, नांदणीचे सरपंच हिरालाल पवार, बापूसो गावडे. के. आर. चव्हाण आदी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या पाण्यावर भांडवलदारांचा डोळा

## खासदार राजू शेट्टी यांची टिका

सरूडः सर्वात मोठा लोकशाही देशात शासन मात्र भांडवदारांचे हित जोपासत आहेत. त्यांचा शेतकऱ्यांच्या जमिनीवर डोळा आहे. म्हणून ते शेतकऱ्यांच्या सिंचनाच्या पाण्यावर डल्ला मारत आहेत. शासनाच्या या अन्यायी धोरणाविरूध्द स्वाभिमानी शेतकरी संघटनेने रणशिंग फुंकलेले असून या पाणी संघर्षयात्रेत शेतकऱ्यांनी सहभागी असे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी केले.

शाहूवाडी तालुक्यातील सरूड, वारणा - कापशी, माणगाव, तुरुकवाडी या गावात खासदार राजू शेट्टी यांचे उत्स्फुर्त स्वागत झाले. यावेळी विविध ठिकाणी सत्कार समारंभात खासदार राजू शेट्टी बोलत होते.

खासदार शेट्टी म्हणाले की, शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी सरकार पळवू पाहत आहे. सरकारने शेतीचे पाणी उद्योगाकडे वळवू पाहत आहे. बागायती जमिनी जिरायती करून शेतकऱ्यांना गुलाम करण्याचा सरकारने डाव आखलेला दिसतो. असला फाजील प्रकार स्वाभिमानी शेतकरी संघटना कदापि खपवून घेतली जाणार नाही. शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी प्रसंगी माझे मी रक्त सांडेन पण मागे हटणार नाही. यावेळी शाहूवाडी तालुकाध्यक्ष भिमराव पाटील, जायंटस् ग्रुप मलकापूरचे भरतेश कळंत्रे, चंद्रकांत मुदुगडे, वसंत पाटील, सागर संभूशेटे, शिवाजी पाटील, विजय पाटील आदी उपस्थित होते.

## स्वाभिमानीच्या संघर्ष यात्रेत नेहमी अग्रभागी राहिलेले कार्यकर्ते

महादेव धनवडे(स्वाभिमानी पक्ष, जिल्हा उपाध्यक्ष), जिनगोंडा पाटील, रोहीत धनवडे, श्रीकांत माळी, बाळू माणकापुरे, दादा तकडे, सुरज रसाळ, संदीप राजोबा, कवी सरकार, सागर संभूशेटे, मनोज जगदाळे, निलेश माणगांवे(नांदणी), गुंडू भाऊ आवटी, प्रभाकर आवटी, दिलीप पाटील(मर्दवाडी), सतिश पाटील, कृष्णा कुंभार, विलास मोरे, माणिक पाटील, आण्णाप्पा इसराण्णा, स्वस्तिक पाटील, दत्ता शिंदे

सदाभाऊ खोत- प्रा. जालधंर पाटील, उल्हास पाटील, जनार्दन पाटील, वासुदेव पाटील, अनिल पवार, एकनाथ जठार, विलास पाटील, तानाजी मगदूम, भिकाजी शिंदे, साताप्पा पाटील, आण्णासो चौगुले, एम, के. नाळे,बंडा मामा पाटील, बाजीराव कांबळे, संभाजी मगदूम, सचिन पाटील, प्रितम पाटील

## स्वाभिमानीची संघर्ष यात्रा कोल्हापुरात धडकली; हजारो शेतकऱ्यांचा सहभाग

कोल्हापूर (प्रतिनिधी)ः पाण्याच्या हक्कासाठी आठ दिवसपासून सुरू केलेली संघर्ष यात्रा कोल्हापुरात येऊन धडकली. शेतीचे पाणी उद्योगाकडे वळवण्याच्या सरकारच्या या निर्णयाचा निषेध म्हणून खासदार राजू शेट्टींनी संघर्ष यात्रा काढली. चांदोली ते कोल्हापूर अशी १८० किलोमीटर खासदार राजू शेट्टींनी पायी प्रवास करून संघर्ष यात्रा पूर्ण केली. स्वतः खांद्यावर कावड घेऊन चांदोलीहून आणलेल्या पाण्याने शाहू महाराजांना जलाभिषेक घालण्यात आला.

चांदोली धरणापासून ३० एप्रिलला संघर्ष यात्रेस सुरूवात करण्यात आली. ३० एप्रिल रोजी चरण ता. शिराळा येथे पहिला करण्यात आला. दुसरा मुक्काम १ मे कोकरूड ता. शिराळा, ३ रा मुक्काम २ मे सवते मठ, चौथा मुक्काम ३ मे शिराळे, ५ वा मुक्काम ४ मे पैजारवाडी, ६ मुक्काम ५ मे पन्हाळा, ७ वा मुक्काम ६ मे निगवे खुर्द, ७ मे रोजी दसरा चौकात संघर्ष यात्रेची सांगता करण्यात आली . तसेच दुसरीकडून संघर्ष यात्रा सदाभाऊ खोत, प्रा. डॉ. जालधंर पाटील यांच्या नेतृत्वाखाली निघाली. दि.३० रोजी राधानगरी धरणावरून यात्रेस प्रारंभ होणार आहे. दि. ३० एप्रिल रोजी तारळे येथे पहिला मुक्काम असणार आहे. दुसरा १ मे रोजी परिते येथे मुक्काम, तिसरा कोगे येथे २ मे रोजी मुक्काम, चौथा यवलूज येथे ३ मे रोजी मुक्काम, पाचवा ४ मे रोजी कंरजफेण येथे मुक्काम नंतर ५ मे रोजी पन्हाळा येथे मुक्कानी आली. असा या संघर्ष यात्रेचा प्रवास झाला. खासदार राजू शेट्टींनी १८० किलोमीटर, तर सदाभाऊ खोत यांनी १७५ किलोमीटरचा पायी प्रवास झाला.या संघर्ष यात्रेत कुणी भाकरी दिली, तर कुणी पाणी दिले. मिळेल ते खाऊन हजारो शेतकऱ्यांनी उन्हा तान्हात संघर्ष यात्रा पूर्ण केली.

# गंगेच्या धर्तीवर पंचगंगेसाठी पाठपुरावा करू

## खासदार राजू शेट्टी : कोल्हापूर व इचलकरंजीतील दूषित पाण्याचा मोठा परिणाम

जयसिंगपूर, ता. २६ : केंद्र सरकारने गंगा नदीच्या प्रदूषणमुक्तीसाठी कोट्यवधी रुपये खर्चून प्रदूषणावर आळा घातला. दैनिक 'सकाळ'नेही 'पंचगंगा वाचवू या' हा उपक्रम राबवून नदीकाठच्या ७२ गावांतील लोकांच्या आरोग्याच्या प्रश्नाला वाचा फोडली. हा प्रयत्न स्तुत्य आहे. मीही पंचगंगा नदीच्या प्रदूषणासाठी सातत्याने विधानसभेत आणि लोकसभेत पाठपुरावा केला आहे; पण लोकांमधून अद्याप म्हणावा तसा उठाव होत नाही. लोकांनी याप्रश्नी पेटून उठले पाहिजे, असे आवाहन खासदार राजू शेट्टी यांनी केले.



ते म्हणाले, ''कोल्हापूर व इचलकरंजी शहरांतील दूषित पाण्याचा पंचगंगेच्या प्रदूषणात मोठा परिणाम होत आहे. या शहरांमधील सांडपाण्यासह औद्योगिक वसाहतींच्या रसायनयुक्त पाण्यावर शुद्धिकरणाची प्रक्रिया करण्याची आवश्यकता आहे. कोल्हापूरमधील दूषित पाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी केंद्र सरकारकडून ७८ कोटी रुपये मंजूर केले असले, तरी या कामाला गती मिळणे आवश्यक आहे. इचलकरंजी शहरातूनही मोठ्या प्रमाणावर दूषित पाणी पंचगंगेत मिसळते. स्वत: नगरपालिकेत बैठक घेऊन शुद्धिकरणाचा प्रस्ताव देण्याचे आवाहन केले होते; मात्र त्याला अद्याप प्रतिसाद मिळाला नाही. लोकसभेतही वेळोवेळी आपण हा विषय उचलून धरला आहे. दूषित पाण्यावर प्रक्रिया करणाऱ्या कारखान्यांनी पुढे आल्यास त्यांना अनुदान मिळवून देण्यासाठी मदत करू; मात्र असे कारखानदार पुढे येत नाहीत ही शोकांतिका आहे.''

# जनतेच्या आरोग्याकडे सरकारचे दुर्लक्ष

## खासदार शेट्टी : मौजे वडगावला व्यायामशाळेचे उद्‌घाटन

शिरोली पुलाची, ता. २५ : भ्रष्टाचारात अडकलेल्या केंद्र व राज्य शासनाकडे सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याकडे लक्ष देण्यास वेळ नाही. यामुळे जनतेने व्यायाम करून आरोग्य सांभाळावे, असे आवाहन खासदार राजू शेट्टी यांनी केले.

मौजे वडगाव (ता. हातकणंगले) येथील नूतन व्यायामशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सरपंच सोनाबाई चौगुले होत्या.

खासदार शेट्टी म्हणाले, ''शासनाचे सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांकडे लक्षच नाही. यामुळे शासनाच्या उपाययोजनांची वाट न पाहता प्रत्येकाने व्यायाम करून शरीर तंदुरुस्त ठेवले पाहिजे.''

आनंदवन कला, क्रीडा व सांस्कृतिक मंडळ आणि जिल्हा परिषद सदस्य महेश चव्हाण यांच्या पुढाकारातून मौजे वडगावात अद्ययावत व्यायामशाळा उभारण्यात आली आहे. या व्यायामशाळेचे उद्‌घाटन खासदार शेट्टी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी एम.टी.एस. परीक्षेमध्ये राज्यात दहावा क्रमांक मिळवलेल्या ऐश्वर्या थोरवत यांचा सत्कार खासदार शेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला.

या वेळी जयश्री यादव, डॉ. अमोल चौगुले, अमीर हजारी, बाळासाहेब थोरवत, प्रताप रजपूत, प्रकाश कांबरे, मानसिंग रजपूत, उदय चौगुले, धोंडिराम चौगुले, सागर अकिवाटे उपस्थित होते. सूत्रसंचालन संदीप थोरवत यांनी केले. आभार राजू थोरवत यांनी मानले.

# लोकांमध्ये लढण्याचे बळ निर्माण करण्यात यशस्वी झालोः खासदार राजू शेट्टी

▸ पान ८ वरून

मस्तकावर जलाभिषेक घालून पुढील लढ्याचे रणशिंग फुंकले. याा पार्श्वभूमीवर त्यांनी पत्रकारांशी मनमोकळेपणाने गप्पा मारल्या. यावेळी त्यांनी आठ दिवसातील अनुभव कथन केले. तसेच पुढील लढ्याची दिशा स्पष्ट केली.

शेतीसाठी पाणी हवं म्हणून धरणं बांधली. शिवाराला पाणी मिळणार,सुख समृध्दी येणार म्हणून लोकांनी आपल्या जमिनी दिल्या आणि भलीमोठी धरणे बांधली. आता मात्र या धरणाचं पाणी शेतीला वगळून इतर कारणासाठी कुणी किती वाटून घ्यायचे याचा हिशेब सुरू झाला आहे. मंत्रींमंडळाकडेच हे वाटपाचे अधिकार म्हणून मध्यरात्री कायदे झाले. दंगा झाल्यावर विधेयक आणले आणि पाण्याचा क्रम बदल्याचे जाहीर केले. तरीही उद्योगांना पाणी देणारंच अशी रट लावली गेलीय. त्या पार्श्वभूमीवर शेतीचं हक्काचे पाणी शेतकऱ्यांना शेतकऱ्यालाच प्राधान्याने मिळायला हवं त्यासाठी लोकांमध्ये लढण्याचं बळ यांव म्हणूनच चांदोली धरणाच्या पायथ्याशी असणाऱ्या गावातून पाणी संघर्ष यात्रेला सुरूवात केली.

पहिल्या दिवशी धरणग्रस्त महिलेने पाण्याचा कलश भरून दिला पायावर पाणी ओतलं आणि धरणापायी आमची हक्कांची जमिन गेली पण त्याचा मोबदला अजून मिळाला नाही. अशी कैफियत मांडली. वाटेत सर्वसामान्य कष्टकऱ्यांकडून झालेल्या स्वागताने भारावून गेलो. कुणी पाणी दिलं, कुणी खायला दिलं. कुणी भाकर खायला दिलं. सर्वांच्या व्यथा जाणून घेत पुढे चालत राहिलो. दुर्गम भागातील जनतेचे होणारे हाल पाहिले आणि पाण्याचा संघर्ष तर आहेच जगण्याचा संघर्ष ही तितक्याच ताकदीने करा म्हणून भाषणातून सांगू लागलो. या सर्व यात्रेतून आलेले अनुभव गाठीशी घेऊन आता पुढे व्यापक असी जनचळवळ उभी करणार असल्याचा निर्धार शेट्टी यांनी सांगितला. आता पाणी विधेयकासाठी रस्त्यावर उतरणार पुढे धरणातील पाणी शेतकऱ्यांच्या संमतीशिवाय उचलू देणार नाही. यासाठी लढा तीव्र करणार असल्याचे सांगितले.

---

## प्रसंगी सरकारवरच चाल करू; सदाभाऊ खोत यांचा खणखणीत इशारा

▸ पान ८ वरून

हक्काचे, नाही कुणाच्या बापाचे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेटा विजय असो, अशा घोषणांनी आसमंत दुमदुमून गेला. संघर्ष यात्रा घोषणा देत राधानगरी येथे आल्यावर याठिकाणी भव्य सभा घेण्यात आली. सदाभाऊ खोत म्हणाले, सरकारने गेल्या अधिवेशनात जलविधेयक मांडताना शेती पिकवणाऱ्या शेतकऱ्यांवर सरकारने अन्याय केलेला आहे. हे आम्ही किती सहन करायचे. धोरण सरकारेच होते नि मरण शेतकऱ्यांचे सुरू आहे. पाणी देताना सरकारने उद्योगधंद्याच्या फायद्याचेच विचार केलेला आहे. शेतकऱ्यांच्या हक्काचे पाणी उद्योगधंद्यांना खैरात वाटावी तशी देण्यात आलेले ाहे. शेतीच्या पाण्याला प्रथम प्राधान्य दिले गेले पाहिजे. कारण धरणे बांधताना जमिनी ह्या शेतकऱ्यांच्याच वापरण्यात आलेल्या आहेत. धरणासाठी काय उद्योगधंद्यांनी जमिनी दिलेल्या नाहीत. या भ्रष्ट सरकारने अनेकांच्या जमिनी लुबाडल्या आहेत.

पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रा. जालधंर पाटील यांनीही सरकारच्या जलविधेयकावर जोरदार टीका केली. खेड्यातील जनता शहरी लोक आणि प्रस्थापित उद्योगपती यांनी दिलेले पाणी, त्यानंतर असमान अन्यायकारक कर याचा आलेख मांडला, तर अध्यक्ष काटे यांनीही सरकारच्या पाणी धोरणावर टीका करीत यापुढे आंदोलन करण्याचा इशारा दिला. यावेळी उल्हास पाटील, बाळासाहेब पाटील, शारदा कोईंगडे यांचीही भाषणे झाली. यावेळी बाबूराव कोथळकर, एकनाथ जठार, वाळवेकर अण्णा, अजित पवार, सुकुमार मुधाळे, अरूणा लिंग्रस, शीतल तिरवडे आदी प्रमुख उपस्थित होते.

# संघर्ष यात्रेची क्षणचित्रे















# संघर्ष यात्रेची क्षणचित्रे











# 'रेशिम' शेतकऱ्यांना एक किफायतशीर उद्योग



## पिक-पाणी


डॉ. जिनेंद्र धनपाल चौगुले
प्लॉट नं. २९, चंद्रधन, माहेर हॉस्पिटलजवळ नांदणी रोड, जयसिंगपूर. येथे संपर्क साधावा.
फोन २२४५१९. मो. ९९२२७७२८१५

रेशिम उद्योग, शेतकऱ्यांना एक हमखास उत्पादन येणार आहे. काळजीपूर्वक केल्यास एकरी ३५,००० ते ४०,००० रुपयांचे उत्पन्न घेणे शक्य आहे. रेशिम उद्योगाच्या विकासासाठी राज्य सरकार प्रयत्न करत आहे. रेशिम उद्योगाची माहिती खआली देलेली आहे, त्याचा उपयोग करून शेतकरी रेशिम उत्पादन करून जादा पैसा मिळवणे शक्य आहे . त्यामुळे रेशिम उद्योगाकडे एक फयद्यातील उद्योग म्हणून पाहिले जाते.

रेशिम उद्योगासाठी आवश्यक असलेल्या तुतीच्या झाडांच्या पानावर रेशिम किटकांचे संगोपन करून रेशिम कोष निर्माण करता येतो. तुती झाडाची लागवड कोणत्याही जमिनीत करता येते. याला इतर पिकापेक्षा कमी पाणी लागते. एकदा लागवड केल्यानंतर कमीतकमी १४-१५ वर्षापर्यंत तुतीची पाने कीटक संगोपनासाठी मिळू शकतात. म्हणून अल्पभूधारक व लहान शेतकऱ्यांनी एक जोड धंदा म्हणून याकडे बघायला काहीच हकरत नाही. रेशिम शेती हा एक सर्वोत्कृष्ट पुरक व्यवसाय म्हणून शेतकऱ्यांनी याचा लाभ घेतला पाहजि.

घरातील वृध्द, स्त्रिया, मुले यांच्याकडून घरच्या घरी कामे करून घेतात. त्यामुळे संपूर्ण कुटूंबाला व्यवसाय उपलब्ध करून देणार हा

पान १९ वर ▸



# 'रेशिम' शेतकऱ्यांना एक किफायतशीर उद्योग

▸ पान १८ वरून

जोड धंहा आहे.रेशिम कोषाच्या उद्योगाला सुरवात करायला जास्त वेळ लागत नाही. केवळ ५-६ महिन्यातच उत्पादनाला सुरवात होते. अत्यंत सोप्या पध्दतीने सहजरित्या शेतकरी हा व्यवसाय सुरू करू शकतो. रेशिम आळ्यांचे खाद्य म्हणजे तुतीची पाने असून याचे उत्पादन सहजरित्या घेता येऊ शकते.सध्या आपल्या भागात असलेल्या नगदीपिकांच्या तुलनेत रेशिम उद्योगही अत्यंत फायदेशीर आहे. म्हणून रेशीम शेती उद्योगाला नगदी पीक पीक म्हणून मोठा वाव आहे. जमीन, पाऊस, हवामान याचा विचार केल्यास आपला भाग उत्तम आहे.

मुख्य बागायत पिकांचा तुलनात्मक विचार केला असता ऊस, सोयाबीन, मिरची, भात, गहू, ज्वारी इत्यादी पिकांची उत्पादन क्षमता प्रती हेक्टरी निव्वळ मिळणारे उत्पादन व पिकासाठी सरासरी गुंतूवणुक व मिळणाऱ्या उत्पादनाची टक्केवारी पाहिली असता तुती रेशीम शेती उत्पादनापासून मिळणारे उत्पादन हे सर्वात अधिक आहे. रेशिम उद्योगात शेतकऱ्यांनी सरासरी एर रुपया खर्च केला असता ३ रुपयापर्यंत उत्पन्न मिळ्ते. म्हणून शेतकऱ्यांनी या उद्योगामध्ये मोठ्या प्रमाणात सहभाग होण्यास काहीच हरकत नाही.

सामान्यपणे तुतीचे झाडे लावल्यानंतर २ते ३ महिन्यानंतर कायम पिक मिळू शकते. पिकाला अंदाजे रुपये १०,००० ते ११,००० एकरी खर्च येतो. मात्र उत्पन्न पाहता ५०,००० ते ५५,००० रुपयापर्यंत येतो.

# शासनाच्या चुकीच्या धोरणाच्या निषेधार्थ पदयात्रा : खासदार शेट्टी

वारणा कापशी, ता. ४ : छत्रपती शिवरायांनी रयतेच्या गवताच्या काडीलाही हात लावू नये, असे आदेश काढले होते. उलट पक्षी सध्याचे सत्ताधारी राजकारणी सर्व सामान्याची लूट करत आहेत. शासनाच्या चुकीच्या धोरणाचा निषेध म्हणून आपण आपल्या सहकाऱ्यांसमवेत आत्मक्लेश म्हणून भर उन्हातून पदयात्रा काढली असल्याचे प्रतिपादन खासदार राजू शेट्टी यांनी केले.

३० एप्रिलपासून चांदोली धरण ते कोल्हापूर अशी पदयात्रा सुरू झाली असून, सत्याग्रह पाण्याचा व पंचनामा भ्रष्टाचाराचा या संघर्ष यात्रेची ७ मे रोजी कोल्हापुरात सांगता होणार आहे. या पद यात्रेचे शाहूवाडी तालुक्यातील प्रत्येक गा-वात उत्स्फूर्तपणे स्वागत झाले. त्या वेळी ठिकठिकाणी आयोजित केलेल्या सत्कार कार्यक्रमात खासदार शेट्टी बोलत होते.

या पदयात्रेत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे शाहूवाडी तालुका अध्यक्ष भीमराव पाटील, वसंत पाटील, जॉयट्स ग्रुप मलकापूरचे भरतेश कळंत्रे, चंद्रकांत मुदुगडे, सगर शंभू शेट्टी, शिवाजी पाटील, विजय पाटील यांच्यासह असंख्य कार्यकर्ते सहभागी झाले आहेत.